**प्रेस नोट दिनांक ०२/०४/२०१९**

**पोलीस स्टेशन नाव -स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे**

**एस टी बसमध्ये राहीलेली महत्वाचे कागदपत्रे असलेली फाईल मिळविणेस मदत**

दि.०१/०४/२०१८ रोजी १५.१५ वा चे सुमारास पोलीस नाईक ४७८३ विजय खोमणे हे स्वारगेट एस टी स्टॅण्ड येथे कर्तव्यावर असताना, महिला नामे राजनंदा अतुल धुमाळ ह्या कराड येथुन शिवशाही बसने पुण्यात आल्या होत्या. स्वारगेट एस टी स्टॅण्ड येथे त्या उतरल्या त्यावेळेस त्यांची महत्वाची कागदपत्रे असलेली फाईल शिवशाही बसमध्ये विसरल्याचे लक्षात आले, त्याबाबत त्यांनी पोलीस नाईक खोमणे यांना सांगितले. पोलीस नाईक खोमणे यांना सदर शिवशाही बसचा नंबर स्वारगेट एस टी स्टॅण्ड वरील सीसीटीव्हि फुटेज व्दारे काढला. त्याचे आधारे स्टॅण्ड येथे चौकशी केली असता, सदरची बस पुन्हा गारगोटी, कोल्हापुर येथे गेल्याचे समजले. त्यावर पोलीस नाईक खोमणे यांनी गारगोटी एस टी स्थानकावर संपर्क साधुन, सदर बस वरील कंडक्टर तानाजी संकपाळ यांचा मोबाईल नंबर मिळविला. सदर कंडक्टर यांचेशी संपर्क साधुन राजनंदा धुमाळ यांचे फाईल बाबत चौकशी करता सदरची फाईल बसमध्ये असल्याचे समजले. ती फाईल महीला नामे राजनंदा धुमाळ यांचे भावाकडे उंब्रज येथे देणेबाबत कंडक्टर यांना सांगितले. त्याप्रमाणे कंडक्टर तानाजी संकपाळ यांनी सदरची फाईल धुमाळ यांचे भाऊ धनराज यांचेकडे उंब्रज येथे दिली. त्याबाबत महिला नामे राजनंदा अतुल धुमाळ यांनी पोलीस नाईक ४७८३ खोमणे यांचे आभार मानले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
स्वारगेट पोलीस स्टशेन पुणे